महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

**विषय–** शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याचे प्रस्ताव स्विकारण्यास मुदतवाढ देण्याबाबत..

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याचे प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दिनांक २० जानेवारी २०१८ पर्यंत होती.

तथापि विद्यार्थी हित लक्षात घेता शासनाने दिनांक ३० जानेवारी २०१८ रोजीच्या पत्रान्वये मुदतवाढ दिलेली असून, त्यानुसार या संदर्भातील प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळाकडे दिनांक १० फेब्रुवारी २०१८ पर्यंत व माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे दिनांक २० फेब्रुवारी २०१८ पर्यंत सादर करावयाचे आहेत.

तरी मार्च २०१८ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी (इ.१०वी) प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, सर्व माध्यमिक शाळा यांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी. कोणताही विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व शाळाप्रमुखांनी दक्षता घ्यावी

31/1

(कृष्णाकुमार पाटील)
सचिव
राज्यमंडळ, पुणे–०४

दिनांक ३१/०१/२०१८

---

पत्र क्र. नाविम/ पमा/427
नागपूर, दिनांक : 01/2/2018

प्रती

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
नागपूर विभाग, नागपूर.

उपरोक्त राज्य मंडळाने परिपत्रकानुसार व शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ नागपूर